
Letter Dated

30 November 1998

Reporting of Samangad

Taluka – Gadhinglaj

# Discovery of Ancient Culture Demarcation




ॐ स्वरुपातील सृष्टी निर्मित सामानगड डोंगर (अतीप्राचिन विशिष्ट डिमार्केशनसह) ता. गडहिंग्लज

सोमवार
दि. ३०.११.९५
गडहिंग्लज
जि. कोल्हापूर

मा. तहसिलदारसो,
गडहिंग्लज तालुका गडहिंग्लज .

यांना ....

विषय :- सामानगड, ता. गडहिंग्लज येथे अतिप्राचिन संस्कृतीच्या विशिष्ट खुणा [डिमार्केशन] मिळाल्याबाबत....

==========================================

अहवाल देणार :- श्री. के. टी. शेलार, फोन - २३५५५
"गुरुकृपा" डॉक्टर कॉलनी, गडहिंग्लज,
व्यवसाय :- सा. बां. खाते, गडहिंग्लज येथे शाखा अभियंता.

वरील विषयानुसार अहवाल सादर करतो कि, माझे मुळ गांव सामानगडाच्या पायथ्याशी असलेल्या मौजे वैरागवाडी, ता. गडहिंग्लज हे असून सामानगडच्या परिसरात [नौकुड] आमचे वंशज सुमारे ११५२ साली वास्तव्यास आले. सध्या माझी दहावी पिढी चालू आहे. सदरच्या सामानगड किल्ला तसेच परिसराशी माझे वंशपरंपरागत भावनिक, मानसिक संबंध गुंतलेले आहेत. तेथील श्रध्दास्थानाशी अतुट संबंध आहे.

याच संबंधातुन दि. १/११/१९९८ रोजी मी सामानगड परिसरास भेट दिली असता, मला त्या ठिकाणी खालील अतीप्राचित कालीन गोष्टी आढळून आल्या आहेत.

सामानगड परिसराचा मुख्या डोंगर हा सृष्टिनिर्मित, अप्रतिम ३२ स्वरुप असून सदरच्या ३२ स्वरुपा-डोंगरावर अतिप्राचिन काली लावलेल्या विशिष्ट खुणा [डिमार्केशन] मिळाल्या आहेत. [ सदर ३२ स्वरुपाचे सर्वसाधारण वास्तव चित्रसोबत जोडले आहे. ] तसेच सदरचे ३२ स्वरुप हे ढोबळ मानाने टोपोशिवार स्पष्ट दिसते.

विशिष्ट खुण क्र. १ :- सदरचा पॉईंट ३२ आकाराचा सुरुवातीचा पॉईंट असून अप्रतिम सनसेट पॉईंट आहे. सदर ठिकाणावरुन पुढयातील भागासहीत वर्तुळाकार [सुमारे ३००° चे ] सुमारे ३० ते ५० कि. मी. लांबीचे सृष्ठीसौंदर्य अप्रतिम स्वरुपात दिसते. सदर ठिकाणी एकावर एक तीन भव्य दगड ठेवलेले असून सदर ठिकाण हे रामखडी किंवा जात्याचे पेड म्हणून ओळखले जाते. सदर दगडावर आजूबाजूच्या दगडावर अतिप्राचिन काली विशिष्ठ उखळी सारख्या खुणालावलेल्या आहेत. [सोबत फोटो जोडला आहे. ]

विशिष्ट खुण क्र. २ :- सदर ठिकाणी मुळ पाषाणावर विशिष्ट अुखळीसारखी खुण लावलेली असून सदर ठिकाणाहून भव्य असे [सुमारे.६ कि.मी. शेवटचा भाग वगळता] अप्रतिम ॐ स्वरूप डोंगर दिसतो. तसेच दक्षिण भागाचे अप्रतिम निसर्ग सौंदर्य दिसते. [सोबत फोटो जोडला आहे. ]

विशिष्ट खुण क्र. ३ :- सदर ठिकाणी भलामोठा दगड असून सदर दगडावर व आजुबाजुच्या पाषाणावर अुखळीसारख्या विशिष्ट खुणा लावलेल्या असून सदर ठिकाण हे ॐ स्वरूपाचे तळातील ठिकाण आहे. सदर ठिकाणाहून वर्तुळाकार [सुमारे ३००$^{0}$] सुमारे ३० ते ५० कि.मी. लांबीचे अप्रतिम सृष्टीसौंदर्य समोरील भागासहीत दिसते.

विशिष्ट खुण क्र. ४ :- सदर ठिकाणी मुळ दगडावर अुखळीसारखी खुण लावलेली असून. सदर ठिकाणाहुन ॐ स्वरूपाचा आतील भाग व ॐ स्वरूपाच्या शेपटाचा संपूर्ण भाग दिसतो. सदर ठिकाणाहून ॐ स्वरूपाचे पोटातील भागाचे अप्रतिम निसर्ग सौंदर्य दिसते व त्या ठिकाणीहून विशिष्ट ठिकाणी स्थापन केलेली मुरारी शिवलिंग मंदिर, मारूति मंदिर, भिमशाप्पा मंदिर, चाळोबा मंदिर, गायीमुख म्हणून प्रसिध्द असलेल्या ॐ स्वरूपाचे पोटातुन अुगमपावलेल्या तिर्थाचा प्रवाह दिसून येतो. सदर ठिकाणाहुन सदर मंदिराचे स्थापनेचा विशिष्ट हेतु स्पष्ठ होतो. [सोबत फोटो जोडला आहे. ]

विशिष्ट खुण क्र. ५ :- सदर ठिकाणी मूळ पाषाणावर अुखळी सारखी विशिष्ट खुण लावलेली असून सदर ठिकाणाहून ॐ स्वरूपाचा अर्धाभाग दिसतो व शेपटीचा अुगमासहित भाग अप्रतिमस्वरूपात दिसतो.

विशिष्ट खुण क्र. ६ :- सदर ठिकाणी बैलाचे शेपटीच्या [कातरलेल्या] गोंड्यासारखी विशिष्ट खुण लावलेली असून सदर ठिकाणाहून अप्रतिम असे सुमारे ३००$^{0}$ चे वर्तुळाकार सुमारे ३० ते ५० कि.मी. लांबीचे सृष्टीसौंदर्य दिसते. सदरचा भाग म्हणजे ॐ स्वरूच्या शेपटीचा शेवटचा भाग गाठ मारलेल्या शेपटीसारखा असून मोगल टेकडी म्हणून प्रसिध्द आहे.

विशिष्ट खुण क्र. ७ :- सदर ठिकाणी गुप्तस्वरूपात गायीमुख म्हणून प्रसिध्द असलेल्या ठिकाणाचा अुगम असून सदर ठिकाणी मुळ पाषावरिल दगडावर नखासारख्या विशिष्ट खुणा केलेल्या आहेत. सदरचे ठिकाण हे ॐ स्वरूपाचे शेपटीच्या अुगमाजवळ आहे. ह्या ठिकाणी अर्धवट बांधलेल्या किल्ल्याचा पाया दिसून येतो.

विशिष्ट खुण क्र. ८ :- सदर ठिकाणी दरड असून त्यामध्ये एकात एक दोन सुंदर कमाणी कोरलेल्या असून त्यामध्ये शिवलिंग स्थापन केलेले आहे. सदर ठिकाण हे अप्रतिम सुर्योदय व पौर्णिमेचा चंद्रोदय पाहण्याचे ठिकाण असून त्या ठिकाणाहून ५० कि.मी. अंतरावर उगवलेला सुर्योदय व चंद्रोदय दिसतो. सदर ठिकाणाचे वैशिष्ट म्हणजे सदर ठिकाणाहुन पाहिल्यास ॐ स्वरूपाचे बाजूच्या दोन्ही डोंगराचे मध्ये सुर्य दक्षिणायण व उत्तरायण करून उगवतो.

विशिष्ट खुण क्र. ९ :- सदर ठिकाणी जमिनीत भुयार असून मुख्य महालात मुळ जांभ्या दगडात कोरलेले प्राचिन शिवलिंग असून बाजूस ओवऱ्या आहेत. तसेच मुख्य भुयारास लागून भुयारतच रहाण्यासाठी, स्वयंपाक घर, बैठकघर, धान्यकोठार बाथरूम, होमकुंड, यज्ञकुंड वैगेरे कोरलेले असून सत्पुरूष समाध्या आहेत.

विशिष्ट खुण क्र. १० :- या ठिकाणी प्रचलित व मान्यताप्राप्त मारूती मंदिर असून या भागातील श्रध्दास्थान आहे.

विशिष्ठ खुण क्र. ११ :- सामानगड किल्ला भाग.

विशिष्ट खुण क्र. १२ :- स्वरूपातील खालच्या पातळीवरील त्रिदी स्वरूप टेकडी.

वरील बाबी बरोबरच अशा अनेक विशिष्ठ खुणा मिळालेल्या आहेत. तसेच अनेक सामानगड किल्याशी संबंधीत ऐतिहासिक घटनाची काळाच्या पडद्याआड गेलेली मुळ ठिकाणे विशिष्ट खुणासहीत मिळालेली आहे. सदरच्या बाबी ह्या प्रत्यक्ष सविस्तर दाखवू शकतो.

तरी मे. साहेबांनी सदर ठिकाणी भेट देवून प्रत्यक्ष पाहून घ्याव्यात व पुढील योग्य ती कार्यवाही करावी हि विनंती.

(सही)
श्री. कै. टी. शेलार,
"गुरूकृपा" डॉक्टर कॉलनी, गडहिंग्लज.
जिल्हा - कोल्हापूर. फोन- २३५५९९
सार्वजनिक बांधकाम ऑफिस २२२७९ (समोर)

सोबत :
१) ॐ स्वरूपाचे नकाशा स्केचर्ड चित्र.
२) फोटो पाठीमागे लिहीलेल्या मजकूरासह.
३) टोपोशिट झेरॉक्स प्रत.

प्रत : मा . पालकमंत्री रामदासजी कदम साहेब, कोल्हापूर जिल्हा यांना
माहितीसाठी पूढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत :- मा. खासदार श्री. सदाशिवराव मंडलिक साहेब यांना माहितीसाठी व
पुढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत :- मा. आमदार श्री. बाबासाहेब कुप्पेकर साहेब यांना माहितीसाठी व
पुढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत :- मा. अध्यक्ष श्री. करिगार साहेब, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना
माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

प्रत :- मा. सभापती श्री. गुरव साहेब, पंचायत समिती, गडहिंग्लज यांना
माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.

७

Letter Dated

25 December 1999

Reporting of Omkar Pathar

Research on Omkar Pathar (Samangad)

अतिमहत्वाचे
==========

गडहिंग्लज

दिनांक : २५/१०/१९९९

मा. तहसिलदारसाहेब,
तालुका गडहिंग्लज.

विषय :- ॐ स्वरुप सामानगडच्या पुढिल संशोधनाबाबत ..

संदर्भ :- माझा दि. ३०.११.१९९८ रोजीचा
ॐ सामानगडचा शोध घेतल्याचा अहवाल

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार अहवाल सादर करतो कि, सामानगड परिसराशी वंशपरंपरेनुसार १९५२ सालापसून माझे संबंध आहेत हे वरील संदर्भिय पत्रात नमुद केलेले आहे. त्यातुनच गेली ३३ वर्षे माझा सामानगडच्या प्राचिन संस्कृतिशी वंशपरंपरागत, सांस्कृतिक तसेच भावनीक संबंध आहेत. त्यापैकि पहिली आठ वर्षे अज्ञानात व त्यानंतरची २५ वर्षे सज्ञानात माझा सामानगड संस्कृतिशी संबंध आलेला आहे.

सामानगडावरील भुयारी शिवलिंगाच्या वाड्यात रहाणारे यशवंत महाराज गावडे [भोसले] हे माझे अध्यात्मातील आद्यगुरु. गेली २५ वर्षे त्यांचा माझा गुरुशिष्य परंपरेतुन वडिल-मुलाच्या नात्याप्रमाणे संबंध होते. त्यांचे दि. २६/१२/१९९८ रोजी वालुज, ता. सिंधुदुर्ग येथे देहवसान झाले तत्पुर्वी त्यांनी गुरुशिष्य परंपरेनुसार सदर भुयारी शिवलिंग व संपूर्ण वाड्याची देखभाल माझ्याकडे सोपवली व ती मी पुर्ण जबाबदारीनिशी सांभाळत आहे. त्यामध्ये कोणतीहि कसुर केलेली नाही.

याच भुयारी शिवलिंगाचे मुख्य गाभाऱ्याची दुरुस्ती करत असतांना सदर डोंगर ॐ स्वरुप असल्याबाबत [माझे गरुंनी सांगितले होते] त्याचा स्पष्ठवानाखुनासहित दि. ३/११/१९९८ रोजी शोध लागला, त्याबद्दल मी रितसर अहवाल वरिल संदर्भानुसार आपल्याकडे दिला आहेच. याच शोधाचा भाग दोन म्हणुन हा अहवाल सादर करत आहे. सामानगडावरील भुयारी शिवलिंगचा संपूर्ण वाडा हा सामान्य वाडा नसुन प्रभु श्री. रामचंद्राचा वनवासकाळातील ॐ स्वरुपात रहाण्याचा संपूर्ण वाडा असुन त्याठिकाणी त्यांचा संपुर्ण रामदरबार पुराव्यानिशी उघड झालेला आहे. त्याठिकाणी त्यांचे मुख्य महालात शिवलिंग, वर गाभारा, ऋषीमुनी निवास्थाने [रेस्टहाउस] जोतिर्लिंग कमानी, अच्युत मंदिर, सनिकुंड, कैलास मंदिर, ऋषीमुनी आराधना स्थाने, रहात्या घराचे वाजुस, उकिरडा, न्हानीघर, सुर्यमंदिर, लक्ष्मणकुठी व धान्य कोठार, श्री. राम बैठकिची खास खोली,

स्वयंपाकघर, शयनगृह, पाकशाळ्यात रहाण्यासाठी ~~अंतिक~~ अतिरिक्त खोली, तपोस्थानाकडे जाण्यासाठी पाय-या, श्री. प्रभू राम तपोस्थान, सदर वाड्यात संपूर्ण पडलेली संरक्षक भिंत [लक्ष्मणरेषा] त्या लक्ष्मण रेषेवर हद्दीचे दगड लाऊन त्यावर शिवलिंग व.सुर्यचंद्र यांच्या कुपेसहित मिळालेले आहे, त्याशिवाय सदरचे ठिकाण हे रामाचे वनवास काळातील निवासस्थान असल्याचे जाणून, माझ्या अभ्यासाप्रमाणे सुमारे पाच हजार वर्षापूर्वी केलेल्या पाच बैठया समाध्या मिळालेल्या आहेत. तसेच सदर ॐ स्वरूपाचे डोंगरात अनेक प्राचिन गुहा तसेच विशिष्ठ कुपा मिळालेल्या आहेत. तसेच प्रभूरामाचे सुर्यास्ताचे दर्शन घेण्याचे रामखडी हे ठिकाण मिळालेले आहे. त्याला आजतागायत परंपरा चालु आहे. त्याठिकाणी कुम [देव] लावलेला आहे.

तसेच आमच्या अभ्यासाप्रमाणे १२ व्या शतकात भोजराजानी किल्याचा पाया बांधला होता, तो सुमारे दोन किलोमीटर परिघाचा पाया बांधून काढल्यासहित मिळाला आहे.

याच बरोबर आमचे गुरुनी सांगितल्यानुसार शिवाजी महाराजानी प्रत्यक्ष वाघीणीचे दुध काढले, तसेच दगडातून बेडकी काढून छत्रपती शिवाजी महाराज्यांचा अहंकार समर्थांनी दुर केला, या दोनी घटना सामानगडावरील सदरची मुळ ठिकाणे शोधली असून त्याठिकाणी डिमार्केशन [देव] लावलेले असून आजतागायत परंपरा चालू आहे. [परंतु परंपरा का चालु आहे हे माहित नव्हते] ती मुळ ठिकाणे शोधली आहेत.

सदरचा शोध हा आध्यात्मिक साधनेव्दारे सुर्याच्या उपासनेतुन [गायत्रीमंत्राव्दारे] स्थुलातून सुक्ष्म, सुक्ष्मातून सुक्ष्म, सुक्ष्मातुन सुक्ष्म, सुक्ष्मातुन सुक्ष्म अशा पध्दतिने घेण्यात आला असून त्यानंतर तज्ञदर्शनी पुराव्यानिशी उघड केलेली आहे.

या ठिकाणी प्रभू श्रीराम वनवास काळातील शेवटची सुमारे ११ वर्षे राहिलेले आहेत, असा आमचा सुक्ष्म अभ्यास सांगतो आहे. त्या तज्ञतदर्शनी पुरावाही जाणून घेणा-याला मी दाखवू शकतो.

तरी याबाबत शासन पातळीवर योग्य ती दाद घेऊन पुढील संशोधन व्हावे त्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याची माझी तयारी आहे. तरी पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी हि विनंती.

तसेच सदरच्या रामाच्या [भुयारी शिवलिंग] वाडयाची, भोजराजांचा अर्धवट बांधलेला किल्ला, प्राचिन गुहा यांची नोंद आजतागायत सातबारा उता-यावर नोंदी नाहीत. तरी सदरच्या नोंदी हया सातबारा उता-यावर व्हाव्यात हि विनंती.

आपला नम्र,

[श्री. के.टी. शेलार ]
"गुरुकृपा" डॉक्टर कॉलनी, गडहिंग्लज
जि.कोल्हापूर. फोन(०२३२७)२३५५५